लोकमत

## दिलीप करंबेळकर : ॲपच्या माध्यमातून मराठी विश्वकोशाचे सर्व खंड होणार ऑनलाईन

# मराठी विश्वकोश जगभर पोहोचणार

लोकमत न्यूज नेटवर्क

वाई : 'मराठी विश्वकोशाची माहिती वीस खंडांमध्ये प्रकाशित करण्यात आली आहे. सध्या मराठी विश्वकोशाच्या प्रकाशित झालेल्या खंडांच्या अद्ययावतीकरणाचे कार्य विद्यमान मंडळाने हाती घेतलेले आहे. त्यासाठी विविध विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था यामध्ये विषयनिहाय ज्ञानमंडळाची स्थापना करण्यात आली आहे. तंत्रज्ञानाच्या वापराने अद्ययावत नोंदी वाचकांपर्यंत तत्काळ पोहोचविण्याची व्यवस्था केली आहे. तंत्रज्ञानावर ज्ञानाला स्वार केल्यास त्याची व्याप्ती जगभर होते,' असे मत विश्वकोशाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मितीच्या वतीने मराठी विश्वकोश मोबाईल ॲपच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.




वाई येथे महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मितीच्या वतीने शुक्रवारी मराठी विश्वकोश मोबाईल ॲपचे लोकार्पण करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन व फित कापून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मोबाईल ॲपचे निर्माते मंदार जोगळेकर, विश्वकोशचे सचिव सुनंदा पवार, सहसचिव डॉ. जगतानंद भटकर, मंडळाचे सदस्य दत्तात्रय पाष्टे, माधवराव चौडे, भैय्यासाहेब देशपांडे, अ. ना. ठाकूर, सरोजकुमार मिठारी, डॉ. शरद अभ्यंकर, सतीश कुलकर्णी, अनिल जोशी, देवानंद शेलार, प्रा. डॉ. स. द. फडणीस, शिल्पा भारस्कर, प्रीती सांळुखे, विनोदिनी निर्गुण, वर्षा देवरुखकर, सचिन भाडळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

### पुस्तक प्रदर्शन..

या ॲपद्वारे मराठी विश्वकोशातील खंडाची माहिती सहज उपलब्ध करता येणार आहे. 'विश्वकोशाच्या माध्यमातून तीन दिवसीय पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. १ ते १५ जानेवारीपर्यंत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा मराठी विश्वकोशाने साजरा करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत पुस्तक प्रदर्शन व मोबाईल ॲपचे लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मोबाईल ॲपचे निर्माते मंदार जोगळेकर म्हणाले, 'जगभरातील लोकांच्या हातात मराठी विश्वकोशाचे खंड देणे ॲपमुळे शक्य झाले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन यामध्ये कराठी विश्वकोशांच्या वीस खंडांची माहिती या ॲपमध्ये समाविष्ट केली आहे.